

# ऐसे माझे बूड...

▶▶ राजू परुळेकर

आयुष्यात अनेकदा आपण चुतिया बनतो. कधी आपल्याहून हुशार माणसांकडून तर बहुतेक वेळेला आपल्याहून चुतिया माणसांकडून! प्रत्येक माणसाच्या आयुष्यात ही दास्तान घडतेच. पण अनेकजण आपल्या आयुष्यातील ही बाब लपवण्यात धन्यता मानतात. कारण त्यांना आपण अजिंक्य, अजेय आहोत अशी स्वत:ची 'प्रतिमा' करायची असते. वास्तविक अशी लपवालपवी हास्यास्पद आहे. कारण ती कुणालाच चुकत नसते. मारीच राक्षस हरिणाचे रूप घेऊन रामाला फसवतो आणि सीताहरण होते. हे त्या पूर्णपुरुषाच्या बाबतीत होतं तर आपण तर सामान्य माणसं. केलेल्या शंभर कृतीतल्या ऐंशी बहुतेक वेळेला आपल्या बुडाशी येतात. याला आपण वेगवेगळी नावं देतो. त्यातलंच एक नाव अपयश हेसुद्धा आहे. पण हे टायटल आपण पांघरुण घालण्याकरता वापरतो. वास्तवात आपण कंप्लिट चुतिया बनलेलो असतो. आपण ते अहंकारात मान्य करायला मागत नाही. नि शेवटी स्वत:लाच फसवत राहातो.

एक काळ होता जेव्हा मी नववीत होतो. स्वाभाविकच अभ्यासात फार लक्ष नव्हतं. पण अभ्यास करण्याच्या प्रक्रियेत असणाऱ्या सर्व हुशार मुलांवर माझं बारीक लक्ष असायचं. कारण हीच मुलं पुढे जाऊन चांगले मार्कस् मिळवून आम्हा चांगले मार्कस् न मिळवणाऱ्या मुलांना उपेक्षेने वागवायची. त्या काळात शाळेच्या मागच्या ग्राऊंडवर एकाच वेळी अनेक क्रिकेट सामने चालत. ते मी तासन् तास बघत बसे. मी 'ढ' नव्हतो. पण भावनिकदृष्ट्या असुरक्षित होतो. शिवाय अभ्यासाच्या प्रक्रियेबद्दल शिक्षकांमुळे मला कंटाळा यायचा. गोडबोले नावाचे एक सर आम्हाला शिकवायचे. त्यांच्याच गणित, सायन्सच्या क्लासला मी जायचो. मी वयाने माझ्या वर्गातल्या इतर मुलांपेक्षा दोन वर्षांनी लहान होतो. साहाजिकच तेवढाच अपरिपक्वही होतो. त्यामुळे ते मला सर्व मुलामुलींसमोर घालूनपाडून बोलत. एकदोन वर्ष ड्रॉप घे, असं त्यांनी मला माझ्या आईसमोर सुनावलेलंही आहे. संस्कृत हा विषयही ते शिकवत. एकदा 'वन' हा शब्द त्यांनी चालवून दाखवायला एका सुवर्णा जोगळेकर नावाच्या मुलीला सांगितलं. ती हुशार मुलगी हुशार होता. 'अ' वर्गातली. तिने तो शब्द भराभर चालवला. मध्येच त्यांनी तिला थांबवलं. अचानक माझ्याकडे मोर्चा वळवला. ती जिथे थांबली होती ते 'वन'चं रूप प्रथमा, द्वितीया किंवा काय आहे? असं विचारलं. माझं लक्षच नव्हतं. कारण क्लासमधल्याच एका मुलीकडे मी बघत होतो. (तिच्या मी प्रेमात पडलो होतो हे मला खूप नंतर माझ्या मित्रांनी समजावलं.) मी पटकन् सरांना 'षष्ठी' असं सांगितलं. ते म्हणाले कुणाची षष्ठी? तुमची की आमची? मग पुढे खूप अपमान...

शाळेत सक्काळी उठून जायला मला फार कंटाळा यायचा. मला रोज उशीर व्हायचा. प्रार्थना सुरू होऊन गेल्यावर मी शाळेत पोहोचायचो. शाळेच्या गेटवर उपमुख्याध्यापिका एकवीस छड्या हातावर वाजवायच्या. नंतर 'कोडगा' म्हणून मला मारणं त्यांनी सोडून दिलं. मी सर्व विषयांतलं जगभरातलं मराठी नि इंग्रजीतलं खूप वाचायचो. म्हणजे शाळा आणि झोप, जेवण या व्यतिरिक्त मी सतत वाचनातच असायचो. पण त्याचा शाळेत किंवा कशालाच तेव्हा उपयोग नव्हता. जगभरातलं अत्युत्कृष्ट असं वाचलेलं माझ्या मनात घोळत राहायचं. त्यामुळे मी शाळेत खिडकीच्या बाहेर बघत वाचलेल्या अद्भूत बाबींवर विचार करत राहायचो. शाळेत मी अगदी 'ढ' नव्हतो. पण अतिहुशार ब्राह्मण मुलांप्रमाणे मी अभ्यासात 'कर्तृत्ववान' नव्हतो. त्यांच्या कशा वह्या, कपडे, गृहपाठ, अभ्यासाच्या वेळा काहीच अपूर्ण किंवा अजागळ नसे. माझं नेमकं याउलट. एकदा गणिताच्या चाचणी परीक्षेत मला आदल्या दिवशी वाचलेलं 'वॉर अँड पीस' आठवत राहिल्यामुळे माझी सगळी गणितं चुकली. मार्क्स चाळिसात शून्य.

**मारीच राक्षस हरिणाचे रूप घेऊन रामाला फसवतो आणि सीताहरण होते. हे त्या पूर्णपुरुषाच्या बाबतीत होतं तर आपण तर सामान्य माणसं. केलेल्या शंभर कृतीतल्या ऐंशी बहुतेक वेळेला आपल्या बुडाशी येतात. याला आपण वेगवेगळी नावं देतो. त्यातलंच एक नाव अपयश हे सुद्धा आहे. पण हे टायटल आपण पांघरुण घालण्याकरता वापरतो.**

दातार म्हणून एक भयंकर कजाग बाई गणित विषय शिकवायच्या. त्यांनी सर्व मुलामुलींसमोर माझ्या सात पिढ्यांची बुद्धिमत्ता काढली! पुन्हा पेपरवर वडिलांची सही आणायला सांगितली. हे म्हणजे आत्महत्यास्वरूपच. कारण बाबा मला बेदम चोपायचे. अनेक जणांनी (त्या वेळच्या) मला बाबांनी केलेल्या शिक्षा आणि त्यांनी चोपलेलं पाहिलेलं आहे. त्यांना मी त्या साऱ्यातून टिकलो कसा? याचंच आश्चर्य वाटतं. मी गणिताचा पेपर चुरगाळून बोळा करून सरळ गटारात टाकला. घरी गणिताचा पेपर उशिरा मिळणार असल्याचं सांगितलं. पण सत्य किती काळ लपणार होतं? एका फितुराने सत्य घरी येऊन माझ्या आईवडिलांना सांगितलं. त्या संध्याकाळी बाबांनी मला भयंकर चोपलंच. पण त्यानंतर एक वेगळीच शिक्षा दिली. पाटा-वरवंटा यातला वरवंटा गळ्यात दोरीने बांधून मला घराबाहेर अंगठे धरून सर्वांना दिसेल असं उभं केलं. मध्यरात्री कधीतरी आईने मला घरात घेतलं.

तर क्लासमध्ये ज्या मुलीकडे मी बघत राहत असे. ती फार सुंदर वगैरे नव्हती. पण भयंकर हुशार वगैरे होती. ती वर्गात पहिली वा दुसरीच यायची. तिच्या घरचं वातावरणही साहित्यिक वगैरे होतं. तिला लेखक वगैरे अप टु डेट माहीत असत. तर मला ती प्रचंडच आवडायला लागली. अर्थात तेव्हाचा सीन रंगवायचा झाला तर तिच्यासमोर मी आत्यंतिक पपलू होतो. पण प्रेम म्हणजे प्रेम. असा पुस्तकं वाचून माझा समज झाला होता. (सिनेमे तोपर्यंत आयुष्यात नव्हते. ते दहावीत आले) तिच्याशी बोलण्याची तर माझी हिंमतच नव्हती. माझा एक मित्र (म्हणजे खरं तर शत्रू) मला असं भासवायचा की तो माझी अवनत स्थिती समजतो आहे. त्याने मला त्या मुलीला चिठ्ठी लिहिण्याविषयी सुचवलं. तोपर्यंत आमच्या शाळेत प्रेमरोगाची लागण होऊन साथ आल्यासारखं झालं होतं. अनेक जोड्या जमल्या होत्या. त्यातल्या अनेक पुढे लग्न न होता तर काही लग्न होऊन तुटल्या. मी काय चिठ्ठी लिहिणार? त्या 'मित्र' असं भासवणाऱ्यानेच मला चिठ्ठीचा मजकूर घातला. तो असा - ''प्रिय xxx, माझे तुझ्यावर प्रेम आहे. तुझे माझ्यावर आहे का? तुझे माझ्यावर प्रेम असल्यास मला कळव. मी वाट पाहत आहे. (कुठे? कधी? कसा? काहीच पत्ता नाही!) तुझा xxx.'' चिठ्ठी त्या मित्र भासवणाऱ्याकडे दिली. त्याला माझी खाट टाकायची संधीच हवी होती. तो सध्या पुण्यात स्थायिक आहे म्हणे. (योग्य जागी गेला!) ती चिठ्ठी त्याच्याकडे सुपूर्द केल्यावर माझी छाती तीन चार दिवस लोहाराच्या भात्याप्रमाणे उडत राहिली. त्याने दुसऱ्याच दिवशी मला चिठ्ठी संबंधित मुलीकडे पोहोचवल्याचं सांगितलं. रोज सकाळी उठल्यावर भयंकर गुलाबी असं माझं भविष्य असल्याचं भासे. त्यापुढे आईचा ओरडा आणि वडिलांचा मार हा तर मोरपिसासारखा होता. पुढे अकरावीत असताना मला मित्रांनी चकवून ब्रँडी प्राजली होती. तेव्हा जशी पावलं हलकी होऊन पृथ्वी डिफेक्टीव्ह असल्यासारखं वाटलं होतं. तसं आता वाटत होतं. पाच दिवसांनी ती मुलगी तिच्याहून हुशार मुलीसोबत क्लासबाहेर एका झाडाखाली उभी होती. तिच्याहून हुशार म्हणजे पुढे दहावीला बोर्डातच येणारी मुलगी. तिचं एकाशी छानसं अफेअर होतं. तिच्या उपस्थितीमुळे मला 'पॉझिटीव्ह थिंकिंग' ची स्वप्नं पडायला लागली होती. मी जिला चिठ्ठी पाठवली होती, ती मागे उभी राहिली होती. अधिक हुशार पण माझा संबंध नसलेली मुलगी पुढे आली. ती म्हणाली, ''हे बघ, आपलं पुढचं वर्ष दहावीचं आहे. आपलं करीयर त्यावर ठरणार आहे. त्यामुळे आपण अशा उद्योगात (!) वेळ घालवायचा नसतो. काय?'' दोघीही हुशार ब्राह्मण. मी येडच्याप, गबाळा. काय बोलणार? तुझं अफेअर नाहीए का? असं तिला विचारायचंसुद्धा मला त्यानंतर तीन वर्षांनी मी लडाखमध्ये एका हॉटेलात झोपलो असताना सुचलं! तो क्षण मात्र मी नंदीबैलासारखी मान हलवत गप्प बसलो. दारूण प्रेमभंगाचं दु:ख पचवत मी नववी पास झालोय् तेसुद्धा चांगल्या मार्कांनी!

**काय सांगू देवा। बुडाचे आजार।**
**व्यर्थ ही विजार। उसवली।।**

**माझिया बुडाने। नाही मी बसत।**
**टेकविता धनी। वेगळाचि।।**

दहावीत जीवशास्त्राच्या बाईंनी मला वर्गाबाहेर काढलं असताना क्लासरूमच्या बाहेर मी उभा होतो. जिला चिठ्ठी पाठवली होती ती मुलगी समोरून आली. तर माझी भयंकर तंतरली. माझ्या परीने मी जणू काही संपूर्ण शाळेसाठी जीवशास्त्राचा काहीतरी प्रयोग करायला उभा आहे असा वाकून उभा राहून स्वत:बद्दल जितकी रिस्पेक्टेबिलिटी दाखवता येईल तेवढी दाखवत राहिलो... दहावीत प्रशांत पौराणा नावाचा वडिलांकडून गुजराती अन् आईकडून मराठी असलेला मुलगा माझा घट्ट मित्र झाला. त्याने मला भाटिवडेकर नावाच्या एका बाईंकडे नेलं. ज्यामुळे मला गणिताचा लळा लागला. अन् गोडबोले सरांना मी अचानक खूप हुशार कसा झालो ते कळेचना! पण ते महत्त्वाचं नाही. या प्रशांतने मला रस्त्यावर वडापाव, भेळ, पाणीपुरी वगैरे खायला शिकवली. अश्लील शिव्यांच्या बाबतीत इम्युन बनवलं. त्याला अमिताभ बच्चन भयंकर आवडत असे. शाळा चुकवून त्याने मला कल्याणला अमिताभच्या नव्या पिक्चरच्या 'फर्स्ट डे फर्स्ट शो'ला नेलं. पिक्चर होतं 'बेशरम'. ते पडलं. पण ते पाहून आल्यावर दुसऱ्या दिवशी उठल्यावर आदल्या दिवशी शाळा

बुडवून मी पिक्चर पाहिलं हे वडिलांना कसं कळलं कुणास ठाऊक? त्यांना बित्तंबातमी पिक्चरच्या नावासकट कळली होती. त्यांनी 'बेशरम' म्हणत मला सणकावून बडवला. इत:पर मी माराला तयार झालो होतो. एकंदरितच माझ्या प्रेमाचं भवितव्य अंध:कारमय होतं. त्यानंतर मी अनेकदा प्रेमात पडलोय्. पण त्या वेळेएवढा इनोसंट प्रेमात मी कधीच नव्हतो. उदा. आपल्याला प्रेमात होकार मिळाला की आपण तिच्यापासून दीड फूट दूर राहूनच बोलायचं असं मी ठरवलं होतं! शिवाय मी तिच्यासाठी आयुष्यात कधीच सिगरेट, दारू वगैरे 'घाण' गोष्टी पिणार नव्हतो! आमच्यापैकी काहीजण इत:पर या दोन्हीहीमध्ये तरबेज झालेले होते. गंमत म्हणजे, सेक्स या गोष्टीबाबत मलाच तोपर्यंत फार कमी जाणकारी होती. त्यामुळे सेक्स, मुलं कशी होतात वगैरेबद्दल मी फार गोंधळात होतो. प्रेमात पडल्यावर डोकं घुमल्यासारखं होतं. छाती लोहाराच्या भात्यासारखी बनते. हे सारं केमिकल रिॲक्शन आहे. हे मला नंतर कळलं. नंतर म्हणजे कॉलेजच्या तिसऱ्या वर्षात. एफ. वाय.ला असताना. हे जाणताना आपला जन्मसुद्धा असाच होतो हे सत्य वर्षात मी रस्त्यावर मारामाऱ्या करायला शिकलो. गावठी रिव्हॉल्वर त्या वर्षी मी पहिल्यांदा पाहिली. मी स्वत: आधीच फार बंडखोर होतो. पण त्याचा खरा साक्षात्कार मला त्या वर्षी प्रथम झाला. कारण नसताना बेदरकारपणे वागून मी फॅकल्टी आणि विद्यार्थी यांच्यात उगाचच अनेक शत्रू निर्माण केले. कॉलेज बंक करून मी पिक्चर बघायला (बऱ्याचदा एकटाच) सुरुवात केली ती याच वर्षी. अर्धवार्षिक परीक्षेला फायनॅन्शियल मॅनेजमेंटचा पेपर दुसऱ्या दिवशी असताना मी आदल्या दिवशी 'बेताब' आणि 'अर्थक्वेक' हे दोन पिक्चर एका दिवसात पाहिले. पैकी 'बेताब' बघताना माझ्या 'फायनॅन्शिअल मॅनेजमेंट'च्या सरांनी मला पाहिलं. त्यांनी मला सावध करण्याचा प्रयत्न केला. मी त्यांच्यासमोर चॅन्सलर सिगरेट शिलगावली. ती तपकिरी असे. अगदी वेगळी दिसे. त्यांनी काय ते ओळखलं. एवढं होऊनही 'फायनॅन्शिअल मॅनेजमेंट'मध्ये मला सेकंड हायेस्ट मार्कस् मिळाले होते. त्यामुळे शेवटच्या परीक्षेपर्यंत मी पूर्ण बेपर्वा, बेदरकार आणि माझ्या आत्मविश्वासाची बेडकी बैलाएवढी फुगली होती. मला आठवतं, भर

**भल्यासी दिधली। कासेची लंगोटी।**
**बुडाची करवंटी। झाकू कैसी।।**
**बेडकीचे मनी। वृषभाची कुडी।**
**विहिरीत उडी। जन्मजात।।**

पचवणं मला फार अवघड गेलं. पण ते फार नंतरचं. तर मी जिला फार सुखात ठेवणार होतो, तिला मी कधीच सुखात ठेवू शकलो नाही. कारण अकरावीत आमची कॉलेजं बदलली. हळूहळू माझ्या तिच्याबद्दलच्या भावनेवर खपली धरली.

अकरावी-बारावीत मी फार हुशार मुलगा मानला जाऊ लागलो होतो. पण ते फार तात्पुरतं होतं. एफ. वाय.ला मी वर्गात फक्त एक-दोनदा गेलो असेन. शेवटी नापास झालो. वर्षाअखेरीपर्यंत मी पुरती पुस्तकंसुद्धा पाहिली नव्हती. तरीही नापास होण्याचा झटका जबरदस्त होता. आपण यानंतर कधीही पास होणार नाही या भावनेने मला घेरलं. त्यातून बाहेर पडायला मला कित्येक वर्षं लागली. मी पदवीधर झालो तेव्हाही मी त्यातून बाहेर आलो नाही. यश या गोष्टीवरचा माझा तेव्हापासून विश्वासच उडाला. त्यानंतर मी अनेकदा हरखून जावं असं यश मिळवलं. मग ॲकॅडमिक बाबतीत असो वा नॉन-ॲकॅडमिक बाबतीत. पण त्याचा आनंद घेण्याचं माझ्या मनातलं इंद्रियच घड्याळाप्रमाणे कायमचं बंद झालं.

एफ. वाय.ला नेमकं असं काय झालं होतं असा मी विचार करतो. तर आठवतं ते असं - एफ. वाय.च्या सुरुवातीलाच माझी आई खूप आजारी पडली. त्यामुळे माझ्या भावनिक असुरक्षिततेमध्ये भर पडली. दुसरं म्हणजे तोपर्यंत मी यश हे गृहीत धरायला शिकलो होतो. त्या पावसात जाऊन एका क्षुल्लक कारणावरून मी एका मुलाला (माझ्या वर्गातल्या) त्याच्या घरच्यांसमोर कानफटात मारलेली होती. या साऱ्याचा शेवट माझा बौद्धिक पतनात झाला. मी दणकन् नापास झालो. माझ्या आयुष्यातल्या अपयशाची ही सुरुवात होती. प्रेमभंगांची अपयशं वगळूनही मी किमान वीस-एक वेळा वेगवेगळ्या क्षेत्रांत दारूण अपयश आणि त्यातून येणारे अपमान बघितले. त्याची ही नुसती झलक होती.

आपल्यात मुलाला "खूप शिक. मोठा हो" म्हणतात. त्यातला मी मोठा झालो नाही तरी खूप शिकलो. ॲकॅडमिक अर्थाने आणि रस्त्यावरही. रस्त्यावर शिकण्यात एक गंमत आहे. सगळं तुम्हालाच ठरवावं लागतं, सगळं तुम्हालाच करावं लागतं. शिक्षक, विद्यार्थी, वर्ग, वर्गात बसणारे, नियम बनवणारे, ते तोडणारे, बोध घेणारे आणि बोधी हे सारे तुम्हीच असता. मी खूप शिकूनही काही काम करायचो नाही. घरात बसून लिहीत राहायचो. माझ्या आजारी आईला ते फार लागायचं. ती म्हणायची, "तू काहीतरी नोकरी कर. बघ इतक्या नोकऱ्या येताहेत." मला फायनान्समध्ये काम करण्याचा मनस्वी कंटाळा यायचा. मग तिच्या समाधानासाठी मी लिखाणातून (त्या काळात इंग्रजी नि हिंदी वृत्तपत्रांमध्ये मी लिहायचो) मिळालेल्या पैशातून पास काढून सकाळी घराबाहेर पडायचो आणि बांद्रा-माहिमच्यामध्ये तुळशीपाईप रोडला वळण आहे. तिथे एक बाग आहे. त्या बागेत माणसं बघत बसायचो. दुपारी

इराण्याकडे काहीतरी खायचो. मग तिथून अमेरिकन सेंटर लायब्ररीत किंवा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात जाऊन वाचत बसायचो. अशी मी शेकडो पुस्तकं वाचलीत. या वर्षांमध्ये मी दिवसेंदिवस कुणाशीच बोलायचो नाही. रात्री आठ वाजता नट, चित्रकार, कवी वगैरे कलावंत मित्रांचा आमचा ग्रुप होता. त्यात बंगाली, मराठी, पंजाबी सगळे होते. रोज मग आमच्यातल्या ज्याच्याकडे पैसे असायचे तो सर्वात अगोदर येऊन माहीमला 'राम-पंजाब' रेस्टॉरंटकडे उभा राहायचा. मग आम्ही तिथेच बसायचो. किंवा कधी जहांगीर आर्ट गॅलरीच्या 'सॅमोव्हर' रेस्टॉरंटमध्ये बसायचो. पहाटे सहा वाजेपर्यंत. आमच्यापैकी प्रत्येकजण चांगल्यापैकी ते अद्भूत प्रतिभेचा धनी होता. प्रत्येकजण वेगवेगळ्या क्षेत्रात धडपडत होता. त्या क्षेत्रातले दिग्गज त्याला चुतिया बनवत होते. मग अध्यात्मापासून ते चित्रकलेपर्यंत आणि राजकारणापासून युद्धशास्त्रापर्यंत, व्यंगचित्रकलेपासून ते म्युझिकपर्यंत अभिजात रात्री आम्ही रंगवायचो. सर्वांना प्रतिभावंतांचं शोषण करणारं हे जग बदलायचं होतं. मला आठवतं, कित्येकदा आम्ही बोलत असताना केवळ आमचं ऐकण्यासाठी रेस्टॉरंटच्या मालकापास्नं ते गिऱ्हाइकांपर्यंत सगळेजण आमच्याभोवती कोंडाळं करत.

गंमत अशी की, आम्ही जग बदलू शकलो नाही. जगाने आम्हाला कंप्लिट चुतिया बनवलं. पुढे आम्हीच जगापुढे बदललो. 'मानस कमल बिश्वास' नावाचा चित्रकार (आता व्हिएन्नात असतो) आमच्या ग्रुपमध्ये होता. त्याने हे स्वत:चं जगापुढे चुतिया बनणं विसरायला लावणारी एक गोष्ट बनवली होती. तो टेबलवर आला की एक स्केच पटकन् तयार करायचा. कुणालाही द्यायचा. स्वत:च्या ग्लासातली दारू चहुबाजूला शिंपडायचा नि म्हणायचा, ''हम सब दोस्त है ना?... तो हम सब एकदम ग्रेट है...'' मग आमचं क्लॅपिंग. मग चर्चेला सुरुवात.

त्या तीन वर्षांत माझी आई माझ्या चिंतेने खचत गेली. मी या विश्वविद्यालयात खरं आयुष्य शिकत राहिलो. मी पहाटे घरी जायचो तेव्हा वडील दरवाजा उघडायचे. ते घरातले एकमेव कमावते होते. ते आता माझ्या तारुण्यात सुरुवातीला माझ्याशी वागत तसे वागत नसत. फक्त माझ्याकडे एक निष्प्राण अशी निराश नजर टाकत आणि मला घरात घेत. मग मी झोपत असे. ते कामावर जात. मला याची लाज वाटत नसे का? तर 'नसे'. कारण मला एक पक्कं माहीत होतं की लाज वाटणं म्हणजे आयुष्याच्या घोड्यावरची मांड ढिली करणं. जे मी आईला, बहिणीला वा वडिलांना समजावूच शकत नव्हतो. त्यांचा मी शंभर टक्के गुन्हेगार आहे हे मला आजसुद्धा पटतं. पण मी जसा आहे त्याला माझा इलाज नाही - नव्हता. त्यामुळेच जगात जेवढा मी चुतिया बनलो, तेवढंच मी घरच्यांशी असं वागून त्यांना चुतिया बनवत होतो.

याच काळात मी ज्योतिष शिकलो. बनारसपासून ते सूर्यसंहिता शिकवणाऱ्यांपर्यंत अनेकांकडून या कलेचे अनेक प्रकारचे धडे मी गिरवले. मी आता ज्योतिष अजिबात बघत नाही. पण त्या काळात मी ज्योतिष शौक म्हणून आणि अहंकार म्हणून बघत असे. तेवीस-चोवीसच्या वयात मी मी म्हणणाऱ्या पंडितांवर मी मात केलेली आहे. माझे आजोबा-आजी वाटतील अशांनी माझे पाय धरलेले आहेत. दहा वाजता उठल्यावर मी त्या दोन-तीन वर्षांत दरवाजात खूप गर्दीला तोंड देत फटाफट ज्योतिष सांगत असे. सगळं अहंकाराच्या दर्पाने. पैसे तर मी केलेल्या कामाचेही कधी तोंडाने मागितलेले नाहीत. हा तर माझा शौक होता. एवढ्या शिकलेल्या नि बुद्धिवादी मुलाने आपली प्रतिभा वाया घालवत (नि आयुष्यही) हे असे 'धंदे' करावेत याचं माझ्या आई-बाबांना वैषम्य वाटत असे. पण हा प्रकार मी स्वत:लाच चुतिया बनवण्याचा होता. हा असा बंद होण्यातला नव्हता.

**ज्याचे पृष्ठी शेण। तोचि बैल जाण।**
**बुडाचे रोगण। बुडालाचि बरे।।**
**ऐसे माझे बूड। राहो अलगद।**
**जेणे मूळव्याध। बरी व्हावी।।**

माझी छोटी बहीण माझा मनस्वीपणा आणि माझ्या बंडखोरीची नकळत शिकार होत होती. कारण आईच्या आजारामुळे आणि माझ्या या अतिरेकी वागण्याने घर तिला तोलावं लागे. त्यात तिचा अभ्यास तिला सातत्याने करता येत नसे. ती कॉलेजच्या अखेरच्या वर्षात असताना तिचं लग्न ठरलं. तिच्या होऊ घातलेल्या नवऱ्याची कुंडली आईने मला दाखवली. आईने मला दाखवलेली ती पहिलीच कुंडली. मी सांगितलं, ''हे लग्न करू नका'' आयुष्यभर मी त्यांचं ऐकलं नाही. त्याचा सूड म्हणून त्यांनी माझं ऐकलं नाही. त्यानंतर ज्योतिषशास्त्राकडे मी कायमची पाठ फिरवली. ती वाजणारी बासरी कायमची विहिरीत टाकून दिली.

आजही बहिणीची मी खूप काळजी घेण्याचा प्रयत्न करतो. बऱ्याचदा ते अति होतं. मी घरच्यांना माझ्या टर्मसवर बनवण्याचा जो प्रयत्न केला त्याचं हे गिल्ट मी वाहतोय्. शेवटी दुसऱ्याला चुतिया बनविण्याचा जराही गेम ज्याने केलाय् त्याचं वर्तुळ पूर्ण होतंच. अखेर तो स्वत:ही चुतिया बनतोच.

आपण सगळेच त्याचं उदाहरण असतो. फक्त काही जणांना हे कळतं नि काहीजणं आपणच आपल्याला चुतिया बनवतोय नि फिरून ते आपल्यावरच येतंय हे विसरून जगाला दोष देत स्वत:ला आपयशाच्या गर्तेत लोटतात. मग भले त्यांना भौतिक यश मिळो...

त्यांना आतमध्ये सत्याचा चटका बसलेला असतोच!

raju.parulekar@gmail.com